Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# भारत-पाकिस्तान सिंधू जलवाटप करार : कराराचे सामरिक महत्व

**डॉ उपेंद्र ज. धगधगे,** सहायक प्राध्यापक व विभाग प्रमुख, संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग, नं. ता. वि. समिती जी. टी. पाटील महाविद्यालय नंदुरबार

**प्रस्तावना**

भारत व पाकिस्तान एकाच भूमीतून निर्माण झालेले दोन देश आहेत. धर्माच्या आधारावर पाकिस्तानची निर्मिती करण्यात आली. भारताला विरोध करणे आणि त्याला अपमानित करण्याचे एकमेव कार्य पाकिस्तान ने केल्याचे भूतकाळातील दाखल्यातून निष्पन्न होते. याव्यतिरिक्त कोणतेही विशिष्ट ध्येय आणि उद्दिष्ट असल्याचे पाकिस्तानच्या निर्मितीवेळी आणि निर्मिती नंतर दिसून येत नाही. १९४७ मध्ये जम्मू आणि काश्मीर संस्थान आपल्या राष्ट्रास जोडण्यासाठी आततायीपणे घुसखोर आणि सैन्य पाठवून तेथे लूट घडवून आणली, ज्यामुळे जम्मू काश्मीर संस्थानने भारताच्या बाजूने कौल देत, भारताची मदत घेतली. तदनंतर असाच निष्फळ प्रयत्न १९६५, १९७१ आणि १९९९ मध्ये केल्याचे सर्वश्रुत आहे.

भारतास समोरासमोरील लढाईत पराभूत करणे अशक्य असल्याचे निष्पन्न झाल्याने, पाकिस्तानने ऑपरेशन टोपाझ सारखे छुपे युद्ध करण्यास सुरुवात केली. दहशतवाद या भ्याड शस्त्राचा वापर सुरू केला. सोबतच फुटीरवादला खत पाणी देवू केले, परंतू आजपर्यंत त्यात पाकिस्तानला यश मिळालेले नाही. एकीकडे पाकिस्तानच्या भारताविरुद्ध आपल्या कुरापती नियमित सुरू ठेवल्या आहेत, तर दुसरीकडे पाकिस्तानातील आर्थिक स्थिती ही हालाखीची आहे. तेथील पायाभूत सुविधा या तुटपुंज्या आहेत. भारत द्वेषापोटी आर्थिकदृष्ट्या असहनीय अशी स्पर्धा पाकिस्तान करीत आला आहे. यामुळे पाकिस्तान हा कर्जबाजारी देश झाला आहे. असे असले तरी भारताने आपल्या मुल्यांनुसार आणि परराष्ट्र धोरणानुसार वेळोवेळी पाकिस्तानला मदत केली आहे.

भारत आणि पाकिस्तान हे दक्षिण आशियातील एकाच राष्ट्रातून वेगळे झालेली दोन राष्ट्रे आहेत. कालांतराने बांग्लादेशामुळे याचे रूपांतर तीन राष्ट्रात झाले आहे. भारताने त्याच्या शेजारील राष्ट्रांशी नेहमीच सहकार्य, मित्रता, सोहार्दाची भूमिका घेतली आहे. पाकिस्तान आणि भारत यांच्यातील सिंधू नदी जलवाटप करार हे त्याचेच एक उत्तम उदाहरण घेता येईल.

पृथ्वीवर सर्वप्रथम जीवनाची सुरुवात पाण्यात झाली. जीवांची उत्पत्ती ही पाण्यातूनच झाली. पाण्यातील सजीव नंतर जमिनीवर वावरू लागलेत. या संजीवातील माकडाचे रूपांतर मानवात झाले. मानवाने केलेल्या प्रगतीत पाण्याचे अनन्य साधारण महत्व आहे. मानवी संस्कृती ही नदीच्या किनारी विकसित झाली. यानुसार जगातील अनेक संस्कृती या नदीच्या किनारी विकसित झाल्याचे इतिहासात दिसते. यावरून असे म्हणता येईल की, मानवी विकासात नद्यांचे अनन्यसाधारण महत्व आहे. एकविसाव्या शतकात पाणी आणि पर्यायाने नद्यांचे महत्व आजही टिकून आहे. आधुनिक काळात पाण्याचे वाढत जाणारे दुर्भिक्षय बघता पाण्याकरीता युद्ध होतील असे म्हटले जाते हे तितकेच योग्य वाटते.

**सिंधू नदी खोऱ्याचे महत्व**

सिंधू नदी भारतीय उपखंडातील एक महत्वपूर्ण नदी आहे. पूर्वीच्याकाळी तिला 'किंग ऑफ रिवर' असे संबोधले जाई. दक्षिण आशियातील महत्वपूर्ण संस्कृतीपैकी सिंधू संस्कृती याच नदीच्या खोऱ्यात उदयास


Copyright © | JET Network, All Rights Reserved

आली, म्हणून त्यास सिंधू संस्कृती असे संबोधतात. झास्कर, श्योक, शिगर, गिलगिट, अस्तोर या उपनद्या तसेच इतर अनेक प्रवाह मुख्य हिमालय श्रेणी, काराकोरम पर्वतश्रेणी, नंगा गिरिपिंड व कोहिस्तान उच्चभूमीवरील हिम व हिमाचे वितळलेले पाणी सिंधू नदीकडे वाहून आणतात. उत्तर पाकिस्तानातील काबूल, स्वात व कुर्रम या सिंधू नदीच्या प्रमुख उपनद्या आहेत. टोची, गुमल, झोब, विहोआ, संगर व रावनी या कमी लांबीच्या नद्या सुलेमान श्रेणीतून पूर्वेस वाहत जाऊन सिंधूला मिळतात. भारतातून वाहत येणाऱ्या झेलम, चिनाब, रावी, बिआस व सतलज या सिंधूच्या सर्वांत मोठ्या उपनद्या आहेत. या पाच नद्यांचा संयुक्त प्रवाह मिळाल्यानंतरचे सिंधूचे पात्र रुंद व उथळ बनले असून ती मंदगतीने वाहते.[१] सिंधू नदी ही जगातील सर्वात लांब नद्यांपैकी एक असून तिची लांबी ३२०० किलोमीटर आहे. तिबेटच्या नैऋत्य कडून उगम पावते आणि अरबी समुद्रास मिळते. सिंधू नदी ही बारमाही नदी आहे. तिच्या सिंचनाखालील भूप्रदेश हा विस्तृत स्वरूपाचा आहे. सिंचन, जलविद्युत आणि मासेमारी इत्यादि करिता सिंधू नदी महत्वपूर्ण ठरते. फाळणीनंतर सिंधुचे मुख्य खोरे पाकिस्तानात गेले, परंतु तिच्या प्रमुख उपनद्यांचे प्रवाह भारतात आहेत. त्या पुढे सिंधू नदिस जाऊन मिळतात.

सिंधू नदीचे खोरे हे पाकिस्तानातील सर्वाधिक लोकसंख्येची घनता असणारे खोरे आहे. सिंधू नदीच्या तीरावरील व तीराजवळील पाकिस्तानमधील प्रमुख नगरे पुढीलप्रमाणे आहेत : कराची, कोत्री, ठठ्ठा, केंटा, हैदराबाद, सेहवान, सक्कर, रोहरी, मिठानकोट, डेरा गाझीखान, डेरा इस्माइलखान, मिआनवाली, कालाबाग, खुशालगढ व अटक. पेशव्यांच्या स्वाऱ्या अटकपर्यंत गेल्या होत्या तेच हे अटक. सिंधूच्या वरच्या खोऱ्यात गिलगिट, स्काईू, लेह, बासगो ही प्रमुख नगरे आहेत.[२] पाकिस्तानातील महत्वाची शहरे सिंधू नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहेत. ज्यामुळे तेथील शेती, मासेमारी, जलविद्युत प्रकल्प सिंधू नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. सिंधू नदी खोरे हे पाकिस्तानच्या कृषी क्षेत्राची जीवन रेषा म्हटली जाते. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान २०१७-१८ च्या आकडेवारीनुसार जीडीपीच्या १८.९ टक्के इतके आहे. सोबतच जलविद्युत प्रकल्पात सिंधू नदी खोऱ्याचे योगदान महत्वपूर्ण आहे. जर भारताकडून या सिंधू नदी आणि त्याच्या उपनद्यांचे पाणी अभावी पाकिस्तानातील जलविद्युत प्रकल्प, शेती आणि एकूणच अर्थव्यवस्था अडचणीत येऊ शकते. यास्तव पाकिस्तान करिता सिंधू जल वाटप करार महत्वपूर्ण ठरतो.

**सिंधू जलवाटप करार**

भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती करण्यात आली. या वेळी राष्ट्राच्या प्रत्येक संपत्तीची वाटणी दोन्ही राष्ट्रात करण्यात आली. त्यावेळी सिंधू नदीच्या पाणी वाटपाचा प्रश्न उपस्थित झाला. पाकिस्तानला पूर्वेकडील नद्यांमधून पुरवठा विद्यमान कालव्यांच्या जाळयात राखण्याचा दावा करावा लागला. १९४७ च्या शरद ऋतूमध्ये जेव्हा मान्सूनचा प्रवाह कमी झाला तेव्हा भारत आणि पाकिस्तानमधील पाणीवाटपाचा संघर्ष पूर्व आणि पश्चिम पंजाबच्या सरकारांमध्ये गंभीर बनला ज्यामुळे रब्बी पिकावर परिणाम होण्याची शक्यता होती. ही गतिरोध दूर करण्यासाठी, दोन्ही बाजूंच्या मुख्य अभियंत्यांनी १८ डिसेंबर १९४७ रोजी भेट घेतली आणि एक स्थिर करार केला ज्यामध्ये अप्पर बडी दोआब कालवा (UBDC), दिपालपूर कालवा आणि बहावलपूर कालवा प्रणालींना उपलब्ध असलेल्या हेडवर्क्समधून सोडण्याची परवानगी देणाऱ्या विद्यमान पातळीवर पाण्याचे वाटप निश्चित केले गेले. परंतु ही स्थगिती तात्पुरती होती आणि स्पष्टपणे असे म्हटले होते की, या समस्येचे कायमचे निराकरण करण्यासाठी कोणताही करार ३१ मार्च १९४८ नंतर होणे आवश्यक असेल जेव्हा करार संपणार होता. सिंधू खोरे २६ दशलक्ष एकर क्षेत्र सिंचन


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

करते, त्यापैकी २१ दशलक्ष एकर क्षेत्र पाकिस्तानात आहे त्यासाठी १० कालवे पाकिस्तानला मिळाले तर ५ दशलक्ष एकर क्षेत्रासाठी भारतास मात्र दोन कालवे मिळाले.[३] या यावरून असे दिसून येते की, भारत आणि पाकिस्तान दरम्यान असलेली सिंधू नदी आणि तिचे खोरे याचे विषम वितरण आहे. पाकिस्तानला सिंचनासाठी मिळालेले कालवे आणि पाण्याचे प्रमाण विपुल प्रमाणात मिळाले. त्यामुळे उभय राष्ट्रातील पाण्याची समस्या अधिक क्लिष्ट स्वरूपाची झाल्याचे दिसते.

ॲरन वुल्फ आणि जॉशुआ न्यूटन यांनी केलेल्या अभ्यासानुसार १९५१ मध्ये पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी टेनेसी व्हॅली अथॉरिटीचे माजी प्रमुख डेव्हिड लिलियंथल यांना भारतात बोलावले. त्यांनी पाकिस्तानला भेट देऊन सिंधू नदीच्या पाणी वाटपावर लेख लिहिला. हा लेख जागतिक बँकेचे प्रमुख आणि लिलियंथल यांचे मित्र डेव्हीड ब्लॅक यांनी वाचला. त्यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्याशी संपर्क केला. त्यानंतर दोन्ही पक्षांमध्ये बैठका सुरू झाल्या. या बैठका जवळपास दशकभर चालल्या आणि १९ सप्टेंबर १९६० कराचीमध्ये सिंधु नदी पाणी वाटपावर स्वाक्षरी करण्यात आली. या कराराअंतर्गत सिंधू नदीसह तिच्या उपनद्यांचे पूर्व आणि पश्चिम नद्यांमध्ये विभाजन करण्यात आले. सतलज, व्यास आणि रावी नद्यांना पूर्व नद्या तसेच झेलम, चिनाब, सिंधू यांना पश्चिमी नद्या ठरविण्यात आले. या करारानुसार पूर्वेकडील नद्यांचे पाणी काही अपवाद सोडल्यास भारत कोणत्याही बंधनांविना वापरू शकतो. पश्चिमेच्या नद्यांचे पाणी पाकिस्तानने घेण्याचे ठरवले. मात्र त्यातील काही नद्यांचे पाणी ठराविक प्रमाणात वापरण्याचा अधिकार भारताला देण्यात आला. त्यामध्ये वीज निर्मिती, शेतीसाठी पाणी वापरण्याची मुभा देण्यात आली.[४] सदरचा करार तत्कालीन स्थिती आणि गरज याप्रमाणे करण्यात आला होता. परंतु त्याकाळची स्थिती आणि परिस्थिती यांच्यात बराच बदल झाला आहे. त्यामुळे उभय राष्ट्र आणि त्यांची एकूण स्थितीत बदल झाला असून त्यानुसार करारात बदल करणे अपरिहार्य झाले आहे. दोन्ही राष्ट्रातील वाढती लोकसंख्या त्याप्रमाणात वाढणारी पाण्याची गरज आणि हवामानातील बदलामुळे या कराराचे पुनर्विलोकन गरजेचे आहे असे भारताचे मत आहे.

**सिंधू पाणी वाटप करार आणि उभय राष्ट्रांतील वाद**

१९६० मध्ये भारत आणि पाकिस्तान दरम्यान जागतिक बँक च्या मध्यस्थीने सिंधू जलवाटप करार करण्यात आलेल्या कराराने उभय राष्ट्रांत सिंधू नदीचे पाणी वाटप ठरविण्यात आले होते. या करारानुसार सिंधू सामंजस्य करारांतर्गत झेलम, चिनाब आणि सिंध या पश्चिमेकडील नद्यांचं नियंत्रण पाकिस्तानला देण्यात आले, या नद्यांच्या ८० टक्के पाण्यावर पाकिस्तानचा अधिकार आहे. भारताला या नद्यांच्या वाहत्या पाण्यापासून वीज निर्मितीचा अधिकार आहे. मात्र पाणी अडविण्याचा किंवा नदीच्या प्रवाहात बदल करण्याचा अधिकार नाही. पूर्वेकडील नद्यांच्या म्हणजेच रावी, सतलज आणि बियास नद्यांचं नियंत्रण भारताकडे आहे. म्हणजेच भारत या नद्यांवर त्याच्या गरजेनुसार प्रकल्प बांधू शकतो, ज्यावर पाकिस्तान आक्षेप घेऊ शकत नाही.[५] एकंदरीत पाकिस्तान हे खालच्या किनारपट्टीचे राज्य बनले जिथे नदी संपते आणि भारत वरचे नदीचे राज्य बनले जिथे नदीचा उगम होतो. या करारानुसार पूर्वेकडील रावी, सतलज आणि ब्यास या तीन नद्यांवर भारताला सिंधू नदी प्रणालीच्या एकूण पाण्याच्या अंदाजे २० टक्के हक्क मिळाला. सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिम वाहिन्या तीन नद्यांवर पाकिस्तानने नियंत्रण मिळवले असून एकूण पाण्यापैकी ८० टक्के पाणी मिळते. हा करार मुळातच पाकिस्तानला पूरक आणि फायदेशीर होता. ज्यादावरे पाकिस्तान च्या शेती आणि उद्योग व्यवसायांना चालना मिळणार होती. तुलनेने भारताला कमी पाणी मिळणार होते,


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

म्हणून त्याचा फायदा खूपच अल्प होणार होता. या कराराला सात दशकाहून अधिकाचा काळ लोटला आहे. या प्राधिकरणाच्या वर्षातून सभा होत असतात, ज्यात समस्या आणि मागणी यावर विचार केला जातो. परंतू यात मोठा बदल झालेला नाही. भारताला यात बदलाची अपेक्षा आहे.

सतलज, ब्यास आणि रावी या पश्चिमेकडील नद्यांवर साठवण यंत्रणा उभारण्याची परवानगी या करारामुळे मिळत नाही, ही भारताची सर्वात मोठी तक्रार आहे. या करारानुसार अपवादात्मक परिस्थितीत अशी यंत्रणा उभारली जाऊ शकते, पण पाकिस्तानकडून अशा प्रकारचे कोणतेही प्रयत्न रोखले जातात, अशी भारताची तक्रार आहे. या नद्या जम्मू-काश्मीरमध्ये आहेत, हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील न सुटलेला प्रश्न आहे. किशन या अनेक प्रकल्पांवरून दोन्ही देशांमध्ये मतभेद आहेत.गंगा, रातले जलविद्युत प्रकल्प आणि त्यानंतर तुळबुल प्रकल्प.[६] भारताच्या मते कारारातील विविध कलम आणि तरतुदीनुसार असे करण्याचा हक्क भारताला आहे, मात्र पाकिस्तान भारताच्या विकास प्रकल्पांवर आक्षेप घेवून त्यात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. ज्याद्वारे भारतास प्रकल्प पूर्ण करण्यास विलंब होईल. यातच पाकिस्तानचे हित असल्याचा, त्याचा गैरसमज आहे.

**निष्कर्ष**

२०१६ मधील उरी येथे दहशतवाद्यांनी झोपलेल्या निशस्त्र सैनिकांवर हल्ला केला त्यात १७ जवान ठार झालेत तर १९ गंभीर जखमी झालेत. २०१९ मध्ये पुलवामा येथे सीआरपीएफ च्या वाहनावर दहशतवाद्यांनी हल्ला केला त्यात ४० जवान शहिद झालेत. या क्रूर कृत्याला उत्तर देताना भारताने सर्जिकल स्ट्राइक केली. सोबतच तुलबुल नेविगेशन प्रकल्पाला गती दिली होती. यामागील उद्देश स्पष्ट करताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले होते की, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही. याचाच अर्थ जर पाकिस्तान भारतीयांचे रक्त वाहू घालणार असतील तर नाईलाजाने भारताला पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या बंद करण्यासाठी सिंधू जलवाटप कराराचा शस्त्र म्हणून उपयोग करावा लागेल.

पाकिस्तानला सिंधू नदीच्या तीन उपनद्यांचे पाणी वापरण्याची मुभा या करारानुसार आहे. परंतू पाकिस्तान आजही ब्रिटिश कालीन कालवे आणि धरणांचा वापर करीत आहे. ज्यामुळे या नद्यांचे पाण्याचा अपव्यय पाकिस्तान कडून होत आलेला आहे. भारताने स्वातंत्र्या पासूनच पश्चिम नद्यांवर विकासाचे विविध प्रकल्प ज्यात धरणे, कालवे, जलविद्युत प्रकल्प उभारणीस चालना दिली आहे. याद्वारे भारताला उपलबद्ध नद्यांचे पाणी पूर्णपणे उपयोगात आणले जात आहे. तसेच गरजेनुसार यात वाढ करण्याचे भारता कडून प्रयत्न होत आहेत.

**संदर्भ**

१. सिंधू नदी (Indus River) – मराठी विश्वकोश
२. उपरोक्त ०१
३. (PDF) THE INDUS WATER TREATY: ISSUES AND CHALLENGES
४. भारत-पाकिस्तानसाठी सिंधू करारचं महत्त्व काय? - BBC News मराठी
५. उपरोक्त ०४.
६. काय आहे सिंधू जल करार? भारताला त्यात बदल का करायचा आहे? - फर्स्टपोस्ट


Copyright © | JET Network, All Rights Reserved